# <u>प्रेस नोट</u>
# पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ – १, वाशी, नवी मुंबई
# सानपाडा पोलीस ठाणे, नवी मुंबई

**गुन्हा रजि. नं. I–४०/२०२१ भादवि कलम ४२०, २८५, ३४ सह जिवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३, ७ व ८**

घरगुती भरलेल्या गॅस सिलेंडरमधुन उघडयावर एका सिलेंडर मधुन दुसऱ्या सिलेंडरमध्ये गॅस पलटी मारतांना ***सानपाडा पोलीसांनी ३ आरोपींना रंगेहात पकडले***

**<u>गुन्हयाची हकिकत</u> :–** घरगुती गॅस हा ज्वालाग्रही पदार्थ असुन गॅसची उघडयावर एका सिलेंडर मधुन दुसऱ्या सिलेंडरमध्ये पलटी मारणे हे मानवी जिवन धोक्यात येण्याची व ज्वलनशिल पदार्थाबाबत हयगई व दुलर्क्ष करण्याची कृती करून केंद्र व महाराष्ट्र शासन यांनी सबसीडीद्वारे रास्त भावामध्ये नागरीकांना पुरविलेले गॅस सिलेंडरचे सिल तोडून त्यातील गॅस हा रिकामी गॅस सिलेंडरमध्ये ट्रान्सफर करून शासनाची तसेच नागरीकांची फसवणूक करीत असतांना तिन आरोपी मिळून आले म्हणुन दिनांक ०९/०३/२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**<u>गुन्हया करण्याची पदधत</u> :–** अटक आरोपीत व पाहीजे आरोपी यांनी आपसात संगणमत करून डीलीवरीसाठी पुरविलेले भारत गॅस कंपनीचे घरगुती वापराचे १४.२ किलो वजनाचे भरलेले गॅस सिलेंडर मधुन एका दोन टोकी नोझल पाईपच्याद्वारे रिकामी असलेल्या गॅस सिलेंडरमध्ये गॅस ट्रान्सफर करतात.

**<u>गुन्हा करतांना खालील आरोपी हे मिळुन आलेले आहे.</u>**
**<u>अटक आरोपी नावे</u> –**
१) मनोज सोनाराम बिष्णोई, वय २१ वर्षे, धंदा नोकरी
२) मनोज हनुमानराम बिष्णोई, वय २२ वर्षे, धंदा नोकरी
३) रामस्वरूप जगदिशराम बिष्णोई, वय२१वर्षे, धंदा नोकरी सर्व रा.सेक्टर ५,सानपाडा,नवी मुंबई
**यांना दिनांक ०९/०३/२०२१ रोजी ०३:१५ वा. अटक केली आहे.**

**पाहीजे आरोपी**
१) मांगीलाल बिष्णोई, २) मनफुल बिष्णोई

**<u>जप्त मुद्देमाल</u>**
६०,०००/– रू. कि. चा महींद्रा मेक्सीमो छोटा टेंम्पो वाहन क्रमांक MH-46-E-0432 जु.वा. कि.सु.
३०,०००/– रू. कि.चे भारत गॅस कंपनीचे घरगुती वापरचे १४.२ किलो वजनाचे भरलेले १५ गॅस भरलेले सिलेंडर जु.वा.कि.सु.
८,०००/– रू. कि. चे ८ रिकामे गॅस सिलेंडर जु.वा.कि.सु.
३,०००/– रू. कि. चे अर्धवट भरलेले २ गॅस सिलेंडर जु.वा.कि.सु.
<u>१,०००/– रू. कि. चा दोन टोकी नोझल पाईप जु.वा.कि.सु.</u>
१,०२,०००/– रू. कि. चा एकुण मुद्देमाल

**<u>तपास पथक</u>** :– सदरची कारवाई हि सानपाडा पोलीस ठाण्यातील वपोनि श्री. सुभाष निकम यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक – निलेश राजपुत (तपास अधिकारी), पोउपनि/ काशिनाथ माने, पोहवा/ १३१५ पानसरे, पोना/ १७८५ नार्वेकर, पोना/ २१२५ होलगीर, पोना/ २९९२ जाधव हे करीत आहेत.

.......................................................................